जनसंपर्क कक्ष

11 OCT 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





# युवा महोत्सवातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव

कोल्हापूरकरांच्यात दानत असल्यामुळे युवा महोत्सव चांगल्या पद्धतीने होत असतो. या महोत्सवातून विद्यार्थी घडत असतात. नाट्य कलाकार, सिने कलाकार, राजकारणी यांची जडणघडण या स्पर्धेतून होते. युवा महोत्सवातून विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव मिळतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ बीसीयुडीचे माजी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी केले.

- डॉ. डी. आर. मोरे यांचे प्रतिपादन
- डॉ. घाळी महाविद्यालयात युवा महोत्सव उत्साहात
- ७४ महाविद्यालयातील दीड हजार विद्यार्थी सहभागी

प्रतिनिधी
गडहिंग्लज

डॉ. घाळी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाअंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयाचा युवा महोत्सव सोमवारी पार पडला. यामध्ये ७४ महाविद्यालयाचे १ हजार ५०० विद्यार्थी सहभागी झाले होते. विशेष म्हणजे, गडहिंग्लज शहरात सोमवारी चांगलाच पाऊस झाला पण तरीही या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा चांगलाच उत्साह दिसून आला. या युवा महोत्सवाच्या निमित्ताने सहभागी विद्यार्थ्यांचे अनोखे कौशल्य शहरवासियांना पहायला मिळाले. दरम्यान, रात्री उशिरापर्यंत महोत्सवातील कार्यक्रम सुरु होते. विद्या प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा रत्नमाला घाळी यांच्या अध्यक्षतेखाली घाळी सभागृहात उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी डॉ. मोरे बोलत होते.



गडहिंग्लज : युवा महोत्सवाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करताना डॉ. डी. आर. मोरे. शेजारी डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. सतिश घाळी आदी.

डॉ. मोरे म्हणाले, विद्यार्थ्यांनी सहनशिलता ठेवली पाहिजे. प्रत्येकाने आपले कौशल्य पणाला लावल्यास यश नक्की मिळते. यातून समाधानही लाभते. चांगल्या गुणवत्तेला नेहमी पुरस्कार मिळतो. विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी साऱ्यांनीच युवा महोत्सवाकडे उदात्त हेतूने पाहिले पाहिजे. शिवाजी विद्यापीठ विद्यार्थ्यांचे कलागुण विकासीस होण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. सतिश घाळी यांनी मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील यांनी स्वागत केले. डॉ. महेश कदम यांनी आभार मानले. डॉ. सरोज बिडकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास डॉ. बांबरेकर, डॉ. आर. जी. कुलकर्णी, डॉ. आर. एस. सावंत, डॉ. व्ही. एम. माने, डॉ. विजया चव्हाण, डॉ. एम. एस. कदम, डॉ. सुरेश चव्हाण, डॉ. डी. जी. चिघळीकर, संस्थेचे उपाध्यक्ष अरविंद कितूरकर यांच्यासह संस्थेचे संचालक उपस्थित होते.

11 OCT 2022 सकाळ
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवातून कलागुणांना वाव

## डॉ. मोरे : घाळी महाविद्यालयात विद्यापीठाचा युवा महोत्सव



गडहिंग्लज : युवा महोत्सवाचे उद्‌घाटन करताना डॉ. डी. आर. मोरे. शेजारी अरविंद कित्तूरकर, डॉ. मंगलकुमार पाटील, डॉ. सतीश घाळी, डॉ. आर. व्ही. गुरव, बी. जी. भोसकी, एम. एल. चौगुले आदी.

**गडहिंग्लज, ता. १० :** युवा महोत्सवातून विद्यार्थ्यांची जडणघडण होते. यातूनच नाट्य-सिने कलाकार, राजकारणी घडतात. त्यामुळे शासनाने या व्यासपीठाला मान्यता दिली आहे. युवा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या आयुष्याला विधायक दिशा आणि कलागुणांना वाव मिळतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या बीसीयूडीचे माजी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी केले.

येथील डॉ. घाळी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाचा ४२ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव झाला. त्याच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. मोरे बोलत होते. विद्या प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा रत्नमाला घाळी अध्यक्षस्थानी होत्या. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

गुरव म्हणाले, 'युवा महोत्सवाकडे विद्यापीठ उदात्त हेतूने पाहते. विद्यार्थ्यांतील कलागुण विकसित व्हावेत यासाठी विद्यापीठ नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे. स्पर्धा निकोप पार पाडली पाहिजे याकडे विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे.'

डॉ. घाळी म्हणाले, 'युवा महोत्सवात यंदा आतापर्यंतची विक्रमी महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे.' श्रीमती घाळी यांचेही भाषण झाले.

प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील यांनी स्वागत केले. प्रास्ताविकात युवा महोत्सवाच्या नियोजनाचा आढावा घेतला. डॉ. बी. व्ही. ताम्हणकर, डॉ. आर. जी कुलकर्णी, डॉ. विजय चव्हाण, प्रमोद बाबरेकर, डॉ. आर. एस. सावंत, पी. एम. माने, 'रवळनाथ'चे अध्यक्ष एम. एल. चौगुले, हिरण्यकेशी फौंडेशनच्या कावेरी चौगुले, डॉ. एम. एस. कदम, डॉ. सुरेश चव्हाण, डॉ. डी. जी. चिघळीकर, संस्थेचे उपाध्यक्ष अरविंद कित्तूरकर, सचिव बी. जी. भोसकी, सहसचिव गजेंद्र बंदी यांच्यासह संचालक उपस्थित होते. डॉ. सरोज बिडकर यांनी सूत्रसंचालन केले. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. महेश कदम यांनी आभार मानले.

### परफॉर्मन्स द्या, विसरून जा...

डॉ. मोरे म्हणाले, 'स्पर्धा कोणतीही असो, सयंम ठेवला पाहिजे. कारण, पुरस्कार प्रत्येकालाच मिळत नाही. आपल्याकडील कौशल्य १०० टक्के पणाला लावणे आपल्या हातात असते. त्यामुळे आपला परफॉर्मन्स द्या आणि विसरून जा. परफॉर्मन्स परफेक्ट असणाऱ्याला पारितोषिक निश्चित मिळते.'

11 OCT 2022 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जल्लोषात रंगला जिल्हा युवा महोत्सव

## शिवाजी विद्यापीठ : लोककलेतून संस्कृतीचे दर्शन, सामाजिक प्रश्नांवर भाष्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज** : लोककला व लोकनृत्यातून वैविध्यपूर्ण संस्कृतीचे दर्शन आणि लघुनाटिका व मूकनाट्यातून सद्य:स्थितीतील प्रश्नांवर मार्मिक भाष्य करत सामाजिक प्रबोधनाचा जागर मांडलेला युवा महोत्सव म्हणजे तरूणाईच्या कल्पकतेचा अन् नवनिर्मितीचा आविष्कारच ठरला. प्रचंड उत्साह अन् मोठ्या जल्लोषात मध्यरात्रीपर्यंत रंगलेला महोत्सव तरूणाईसाठी अविस्मरणीय ठरला.




गडहिंग्लज येथील डॉ. घाळी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाचा जिल्हास्तरीय युवा महोत्सव अमाप उत्साहात पार पडला. या महोत्सवात अंबाबाईचा गोंधळ, जागर मराठीचा, लोकनृत्य, सुगम गायनाने रसिक मंत्रमुग्ध झाले. (आशपाक किल्लेदार)

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागातर्फे येथील डॉ. घाळी महाविद्यालयात ४२ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव अमाप उत्साहात पार पडला. जिल्ह्यातील ७६ महाविद्यालयातील १३०० विद्यार्थी महोत्सवात सहभागी झाले होते.

विद्या प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा रत्नमाला घाळी यांच्या अध्यक्षतेखाली 'बीसीयुडी'चे माजी संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने महोत्सवाचे उद्घाटन झाले. प्राचार्य मंगलकुमार पाटील यांनी प्रास्ताविक केले.

डॉ. सतीश घाळी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्राचार्य डॉ. बी. व्ही. ताम्हणकर, प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. विजया चव्हाण, प्राचार्य डॉ. योजना जुगळे, आदी उपस्थित होते.

सकाळ



गडहिंग्लज : घाळी महाविद्यालयात झालेल्या युवा महोत्सवात कला सादर करताना स्पर्धक विद्यार्थी. (आशपाक किल्लेदार : सकाळ छायाचित्रसेवा)

# पावसाच्या सरींवर तरुणाई 'भारी'

## युवा महोत्सव : उत्साह तसूभरही झाला नाही कमी

**गडहिंग्लज, ता. १० :** पंचपक्वानाचे ताट वाढलेले असावे आणि त्यातील पहिल्याच घासाला खडा लागावा, तसा उद्‌घाटनाच्या तोंडावर कोसळलेला जोरदार पाऊस. त्याची रिपरिप कायम राहिली तरी विद्यार्थ्यांचा तसूभरही कमी न झालेला उत्साह. मंडपाच्या छतातून ठिबकणाऱ्या पाण्यापासून बचावासाठी एका हातात धरलेली छत्री तर दुसरा हात हवेत उंचावत ठोकलेली आरोळी. पावसाच्या सरींवर भारी ठरलेली ही तरुणाई स्पर्धकांचा उत्साह दुणावण्यास साहाय्यभूत ठरली. निमित्त होते, शिवाजी विद्यापीठाच्या ४२ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे.

गडहिंग्लजला प्रथमच झालेल्या या महोत्सवाची डॉ. घाळी महाविद्यालयाने जय्यत तयारी केली. पण, महोत्सवावर वरुणराजाची अवकृपा दिसून आली. सकाळी मुसळधार तर सायंकाळी चारपर्यंत रिपरिपणाऱ्या पावसाला ना संयोजकांनी जुमानले ना स्पर्धक विद्यार्थ्यांनी. त्याला साथीला घेतच आपल्यातील कलागुणांची मुक्त उधळण केली. पावसात भिजल्याने डोकीवरील फेट्याच्या पडलेल्या तुऱ्याकडे लक्ष वेधल्यानंतर तुरा

**" पावसाची शक्यता गृहित धरून विद्यापीठाने 'प्लॅन बी' तयार ठेवण्याची सूचना केली होती. त्यानुसार नियोजन केले. त्यामुळे पाऊस असूनही महोत्सवात खंड पडला नाही. महोत्सवासाठी राबणाऱ्या प्रत्येक हाताला याचे श्रेय जाते.**

**– डॉ. मंगलकुमार पाटील,** प्राचार्य

कोलमडला असला तरी आम्ही कोलमडलेलो नाही असे सांगणारी स्पर्धक विद्यार्थिनी अडचणींना हिमतीने सामोरे जाण्याचा जणू संदेश देत होती.

मुख्य रंगमंचावर लोकसंगीत वाद्यवृंद, लोककला, लोकनृत्य तर कला अकादमीत लघुनाटिका, मूकनाट्य, नकला, शारदा भवनवर भारतीय समूहगीत, सुगम गायन, गणेश मंगल कार्यालयात एकांकिका यांसह वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा झाली. ७६ महाविद्यालयांतील १२६५ स्पर्धक विद्यार्थी सहभागी झाले होते. मोठ्या उत्साहाने कला सादर करणारे विद्यार्थी आणि तितक्याच उत्साहाने त्यांना पाठिंबा देणारे स्पर्धक विद्यार्थी असे चित्र होते.

लोकमत

# विद्यापीठाच्या ९० टक्के परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने उन्हाळी सत्रात घेतलेल्या ९० टक्के परीक्षांचे निकाल आतापर्यंत लागले आहेत. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या ६०३ पैकी ५९० परीक्षांचे निकाल ऑनलाइन जाहीर केले आहेत. विद्यापीठाच्या विविध ७४७ अभ्यासक्रमांच्या ६०३ परीक्षा एमसीक्यू स्वरूपात घेण्यात आल्या. त्यातील ५९० परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. उर्वरित १३ परीक्षांचे निकाल पुढील आठवड्याच्या अखेरपर्यंत जाहीर करण्यात येतील. पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्रातील परीक्षा १५ डिसेंबरपासून घेण्याचे नियोजन आहे.

11 OCT 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विज्ञानाच्या विश्वात

# नव्या खंडाची निर्मिती!

डॉ. व्ही.एन. शिंदे

असं म्हणतात की, विश्वात केवळ एकच गोष्ट कायम आहे, चिरंतन आहे आणि ती गोष्ट म्हणजे बदल. काही बदल तत्काळ घडतात, तर काही बदलांना हजारो, लाखो, कोटी वर्षे लागतात; मात्र विश्वात प्रत्येक क्षणाला बदल होतात. मानवाने अनेक बदलांचे अनुमान बांधण्यासाठीची तंत्रे विकसित केली आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मानवाने हवामानाचा अंदाज व्यक्त करण्यापर्यंत मजल गाठली. अनेकदा हे अंदाज अचूक ठरतात आणि काही वेळा ते विनोद ठरतात. अजून हे तंत्र अचूक बनलेले नाही. मात्र, रोज सूर्य उगवतो, मावळतो; मात्र सूर्योदय किंवा सूर्यास्त कंटाळवाणा होत नाही. चंद्राच्या कला दररोज बदलतात, त्यामुळे कोणाला चतुर्दशीचा चंद्र, तर कोणाला पौर्णिमेचा चंद्र आवडतो. मात्र, चंद्र सर्वांना आवडतो. निसर्गात वाढणारी झाडे दररोज वेगळ्या रूपात दिसतात. त्यामुळे निसर्गाचा, सूर्याचा, चंद्राचा कधीही कोणाला कंटाळा येत नाही. हे सर्व आठवण्याचे कारण म्हणजे पृथ्वीवर आणखी एका खंडाची निर्मिती होणार असल्याचे संशोधकांनी जाहीर केले आहे.

पृथ्वीच्या निर्मितीपासून असे बदल होत आहेत. हे बदल अविरत आहेत. काही संशोधकांच्या मते फार पूर्वी पृथ्वीवर सलग भूप्रदेश होता. पुढे लाखो वर्षांमध्ये जमिनीचे भूभाग वेगळे झाले आणि वेगळे खंड तयार झाले. भारत आणि श्रीलंका जोडले गेलेले होते. या दोन देशांना जोडणारा सेतू हा पूर्वी जमिनीचा भूभाग होता. आफ्रिका आणि आशिया खंडही जोडले गेलेले होते. विशेषतः भारत आणि आफ्रिकेमध्ये असणारी झाडे आणि पिके सारखी आहेत. पुढे हे भूभाग वेगळे झाले आणि आज पृथ्वीवरील भूभाग आशिया, आफ्रिका, युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, अंटार्क्टिका आणि आर्क्टिक या सात खंडात विभागले आहेत. यातील असिरीयन म्हणजे उगवता सूर्य किंवा पूर्व यावरून आशिया हे नाव देण्यात आले. आफ्रिकेमध्ये राहणाऱ्या आदिवासी जमातीच्या नावावरून रोमन राजांनी या भागास आफ्रिका नाव दिले आणि तेच खंडाचे नाव कायम राहिले. युरोपियन लोक आपल्या भागास जगाची मुख्य भूमी मानत, त्यावरून या भागातील देश युरोप खंडाचे भाग बनले. अमेरिका हे खंडाचे नाव कोलंबसने आपला सहकारी अमरिगो वेसापुसी याच्या नावावरून दिले. ऑस्ट्रेलिस म्हणजे दक्षिण त्यावरून त्या भागातील खंडास ऑस्ट्रेलिया नाव मिळाले. आर्क्टिक आणि अंटार्क्टिका हे परस्परविरोधी शब्द आहेत. आर्क्टिक हा ग्रीक शब्द आहे आणि त्याचा अर्थ अस्वल असा होतो. असे हे सात खंड. यामध्ये आता आणखी एका खंडाची भर पडणार असल्याचे भाकीत करण्यात आले आहे. पॅसिफिक महासागराचा आकार लहान होत आहे आणि त्यातून आणखी एक भूभाग तयार होणार आहे. ऑस्ट्रेलियन संशोधकांच्या म्हणण्यानुसार दरवर्षी पॅसिफिक महासागर एका इंचाने आकुंचन पावत आहे. त्यातून नव्या खंडाची निर्मिती होण्यास सुमारे २० ते ३० कोटी वर्षे लागतील. अमेरिका आणि आशिया हे दोन खंड परस्परांना जोडले जातील आणि त्यापासून अमेशिया हा नवा खंड तयार होईल. कार्टिन विद्यापीठ, पर्थमधील संशोधकांनी 'सुपर कॉम्प्युटर सिम्युलेशन'च्या माध्यमातून हे निष्कर्ष काढले आहेत. सुमारे १८० कोटी वर्षांपूर्वी विस्तीर्ण भूभागाच्या जमिनीखालील घडामोडींमुळे विभागणी झाली आणि दोन वेगळे भूभाग तयार झाले. आंतरिक भूभागात समुद्र तयार झाले. आज ऑस्ट्रेलिया खंड उत्तरेकडे सरकत आहे. फार पूर्वी सर्व भूभाग एकत्र होते आणि त्याला नूना खंड असे ओळखले जाई. ३०० दशलक्ष वर्षांपूर्वीच्या विशाल भूभागास पँगिया असे म्हणत. त्याच्या ९० अंशामध्ये दुसरा खंड रॉडिनिया वसलेला होता. पँगिया खंडावर डायनॉसॉर आणि सरपटणारे प्राणी मोठ्या प्रमाणात होते. डायनॉसॉरचा विनाश हा मोठ्या उल्कापातामध्ये झाला असे संशोधकांचे मत आहे. काही संशोधकांच्या मते सर्वच खंड उत्तरेच्या दिशेने सरकत आहेत. भविष्यात सर्व खंड एकत्र येतील आणि एकच महाखंड तयार होईल. या सर्व प्रक्रियेला वैज्ञानिकांनी 'आर्थोर्जन' प्रक्रिया असे नाव दिलेले आहे. आज आपण पृथ्वीच्या ज्या अक्षांश, रेखांशावर आहोत, ते भविष्यात वेगळ्याच अक्षांश आणि रेखांशावर असतील. ऑस्ट्रेलिया भविष्यात भारताचे शेजारी राष्ट्र असेल. संशोधकांच्या मते वर्षानुवर्षे खंड निर्मितीची प्रक्रिया घडत आहे. ही सर्व प्रक्रिया मागील दोन अब्ज वर्षांपासून घडत आहे. साधारण ६० कोटी वर्षांत खंड निर्माण होतो. सध्या संशोधकांनी जे अनुमान काढले आहे, ते सर्व घडण्यासाठी जेवढा कालावधी जाणार आहे, ते पाहता आपण चिंता करण्याचे कोणतेच कारण नाही. जेव्हा एकच महाखंड अमेशिया अस्तित्वात येईल, तेव्हा एक कोटी पिढ्या संपलेल्या असतील. तेव्हा कोणती संस्कृती असेल, कोणती भाषा असेल, याचा अंदाज कोणी बांधलेले नाहीत. मुळात त्यावेळी मानव अस्तित्वात असेल किंवा नाही हा प्रश्न पडतो. सध्या जागतिक तापमान वाढ आणि पर्यावरण आणि प्रदूषणाचे निर्माण झालेले प्रश्न लक्षात घेता, पृथ्वीवरील जीवसृष्टी धोक्यात असल्याचे बहुतांश संशोधकांचे मत आहे. भूकंप, ज्वालामुखी, पूर, दरडी कोसळणे अशा आपत्ती वारंवार येणार आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणात मानवी जीवसृष्टी नष्ट होण्याची शक्यता आहे. भूकंप आणि ज्वालामुखीच्या माध्यमातून भूगोल बदलला जाणार आहे. याची तीव्रता कमी करायची असेल, तर मानवाचे वर्तन पर्यावरण आणि निसर्गस्नेही असणे आवश्यक आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गाची हानी थांबायला हवी. वृक्ष, पशु, पक्षी या सर्वांसाठी अवनी आहे, ती केवळ मानवाची संपत्ती नाही, हे लक्षात घ्यायला हवे. पर्यावरणतज्ज्ञ आणि एकूणच बदलत्या परिस्थितीत निसर्गाचे बदलते रूप कोणते दिवस दाखवणार याचा गांभीर्याने विचार करायला हवा.

संपर्क : ९९७३७८४४००
vilasshindevs44@gmail.com